**प्रेस नोट** **दिनांक २५/०४/२०१९**

# अलंकार पोलीस स्टेशन

## ऑनलाईन फसवणुक करुन २४ लाखाला गंडा घालणाऱ्या आरोपी अटक

दिनांक १२/०४/२०१९ रोजी अलंकार पोलीस स्टेशन गु.र.नं १४/२०१९ भादंवी ४०६,४२० आयटी ॲक्ट ६६(सी)(डी) या गुन्हयाचे तपास कामी नवी दिल्ली येथे सहा पोलीस फौजदार वेगरे व पोलीस नाईक ६९५५ भिंगारदिवे असे गेले आरोपी नामे अमनदिप सिंग हरभजनसिंग धामी रा. गल्ली नंबर १२ तिलक नगर नवी दिल्ली याने वरील गुन्हयात २३ लाख ९३ हजार रुपयाची फसवणुक केली होती. त्याचे तपासा बाबत माहिती काढली असता तो वरील पत्त्यावर सध्या रहात नाही असे कळाले पुढील तपासकामी शिताफिने प्रयत्न करता तो दिनांक १८/०४/२०१९ रोजी गोल सरकल तिलक नगर नवी दिल्ली येथे येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलीस निरीक्षक (गुन्हे) राजेश तटकरे, सहा पोलीस फौजदार वेगरे व पोलीस नाईक ६९५५ भिंगारदिवे यांनी त्यास ताब्यात घेवुन दाखल गुन्हयात अटक केले.